स्थापना: १९८८

एसएसके धनलक्ष्मी

नागरी सहकारी पतसंस्था मर्या. नायगांव (सिन्नर)

३८ वा

वार्षिक अहवाल

2025-2026

विश्वास..
भक्ती..
समृद्धी..

लोकजीवन समृद्ध करणारा वारसा !

स्थापना: १९८८
एसएसके धनलक्ष्मी
नागरी सहकारी पतसंस्था मर्या. नायगांव (सिन्नर)

38 वा
वार्षिक अहवाल
— 2025-2026 —

विठ्ठलभक्तीचा मार्ग, संस्कारांची शिदोरी..
आपले विचार या अर्थप्रवासाचे सोबती..

प्रेरणास्थान
सहकारमित्र **शिवाजीराव कातकाडे**

स्थापना: १९८८

एसएसके धनलक्ष्मी

नागरी सहकारी पतसंस्था मर्या. नायगांव (सिन्नर)

38 वा

वार्षिक अहवाल

— 2025-2026 —

श्री. संग्राम कातकाडे
अध्यक्ष

श्री. प्रकाश जेजुरकर
उपाध्यक्ष

संचालक मंडळ

श्री. ज्ञानेश्वर लहाने

श्री. प्रभाकर जेजुरकर

श्री. साहेबराव बोडके

श्री. यादव कापडी

श्री. संजय कुटे

श्री. कुणाल कातकाडे

श्री. भिमराव गायकवाड

सौ. नर्मदा पानसरे

सौ. साधना फुलसुंदर

श्री. सुदाम कमोद

श्री. लक्ष्मण जेजुरकर

श्री. दिलीप लहाने

श्री. कैलास गिते

श्री. सुनिल भाबड
(मुख्य कार्य अधिकारी)

श्री. सोमनाथ घुगे
(विभागीय अधिकारी)

श्री. विलास केदार
(विभागीय अधिकारी)

सौ. जयश्री कातकाडे
(सचिव)

नाशिक जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित,नाशिक यांचेतर्फे सहकार प्रेरणा गौरव पुरस्कार २०२६-प्राप्त

१. सहकार क्षेत्रात संस्थेने उत्कृष्ट व उल्लेखनिय कामगिरी करतांना आपल्या संस्थेस नाशिक जिल्ह्यातुन **सर्व प्रथम महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र** मिळाल्याबद्दल **विशेष कार्य पुरस्कार प्राप्त.**

२. १०० कोटीच्या पुढील ठेवी असलेल्या सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात उत्कृष्ट कामकाज केल्याबद्दल संस्थेस **प्रथम पारितोषिक** प्राप्त.

3. १०० कोटीच्या पुढील ठेवी असलेल्या पतसंस्था गटातील सहकार महर्षी स्व. भास्करराव तथा आबासाहेब कोठावदे यांच्या स्मृती प्रित्यर्थ **उत्कृष्ट मॅनेजर/ CEO पुरस्कार प्राप्त.**

दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी संस्थेच्या ठाणगांव ता. सिन्नर शाखेचा लोकार्पण सोहळा!

दि. २६ मे २०२६ रोजी संस्थेच्या दोडी बु. ता. सिन्नर शाखेचा लोकार्पण सोहळा!

३९ वी अधिमंडळाची वार्षिक सभा नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची ३९ वी अधिमंडळाची वार्षिक सभा **शनिवार, दि. २६/०९/२०२६ रोजी सकाळी ठिक १०:०० वाजता संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. संग्राम शिवाजीराव कातकाडे** यांचे अध्यक्षतेखाली प्रशासकीय कार्यालय, सहकार भवन, नायगाव, ता. सिन्नर (नाशिक) येथे खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित केली आहे, तरी आपण सभेस वेळेवर उपस्थित रहावे हि विनंती.

सभेपुढे येणारे विषय

१. दिनांक २७/०९/२०२५ रोजी झालेल्या अधिमंडळाची वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
२. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास मान्यता देणे.
३. मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाच्या नफा वाटणीस मान्यता देणे.
४. सन २०२५-२०२६ चा लेखापरीक्षकांचा अहवाल वाचुन त्याची नोंद घेणे व दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.
५. सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता संचालक मंडळाने तयार केलेल्या उत्पन्न व खर्चाबाबतच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे व सन २०२५-२०२६ च्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
६. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात सामोपचार योजने अंतर्गत बंद झालेल्या थकीत खात्यांची नोंद घेऊन मान्यता देणे.
७. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात धर्मदाय निधीतून दिलेल्या देणगीस मान्यता देणे.
८. वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेली कर्ज प्रकरणे वसुलीचा हक्क ठेवुन निर्लेखीत करण्यास मंजुरी देणे बाबत.
९. सहकार सक्षमीकरण निधी इमारत निधीत वर्ग करणे बाबत मान्यता देणे.
१०. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात संस्थेच्या शाखा विस्तार/नुतनीकरण कामी झालेल्या खर्चास मान्यता देणे.
११. सन २०२६-२०२७ च्या आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षकाची नेमणुक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
१२. संस्थेचा शाखा विस्तार करणे व परवानगी मिळालेल्या चास व निमोण शाखांची पुर्नपरवानगी बाबत निर्णय घेणे.
१३. प्रशासकीय कार्यालय व नायगांव शाखेसाठी वाढीव बांधकाम करणे बाबत निर्णय घेणे.
१४. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या संस्थेच्या नावात बदल करणे बाबत मान्यता देणे.
१५. मा. अध्यक्ष सो. यांच्या पुर्व परवानगीने येणाऱ्या विषयाचा विचार करणे.

श्री.सुनिल लक्ष्मण भाबड
(मुख्य कार्यकारी अधिकारी)

सुचना :-

१. कोरम अभावी तहकुब झालेली सभा त्याच ठिकाणी त्याच दिवशी अर्ध्या तासाने घेण्यात येईल व विषय पत्रिकेत नमुद केलेल्या विषयांचा विचार करण्यात येईल.त्यास कोरमची गरज राहणार नाही.
२. विषय पत्रिकेस अनुसरून सभासदांना काही सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी दि.२४/०९/२०२६ पर्यंत संस्थेच्या प्रशासकीय कार्यालयात सायं.५ वाजेपर्यंत संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे लेखी स्वरुपात आणुन द्याव्यात. त्यानंतर आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.
३. सभासदांच्या माहितीसाठी संस्थेचे सन २०२५-२०२६ चे आर्थिक पत्रके व लेखापरीक्षण अहवाल संस्थेच्या प्रशासकीय कार्यालयात कार्यलयीन वेळेत उपलब्ध केलेले आहेत.

संस्थेचा आर्थिक संक्षिप्त अहवाल दि.३१/०३/२०२६ अखेर

(रक्कम कोटीत)

संस्थेचे नांव		एसएसके धनलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,नायगांव
केंद्र कार्यालय पत्ता		सहकार भवन,नायगांव,ता.सिन्नर, जि.नाशिक (४२२१०२)
नोंदणी क्रमांक		एन.एस.के./एस.एन.आर/बी.एन.के./(ओ) १००५/ दि.१५/१२/१९८८
संस्थेचे कार्यक्षेत्र		महाराष्ट्र राज्य
संस्थेच्या शाखा		प्रशासकीय कार्यालय-१
		शाखा-१५
सभासद संख्या		२४३८३
भागभांडवल		५.००
वसूल भागभांडवल		२.८०
राखीव निधी व इतर निधी		१९.२४
ठेवी	सेव्हिंग	१६.५९
	मुदत ठेवी	२४८.९३
कर्ज	तारणी कर्ज	२०९.६०
	विनातारणी कर्ज	५.४३
गुंतवणुक		७७.२६
ऑडीट वर्ग		अ
एकूण व्यवसाय		४८०.५६
एकूण कर्मचारी		९६
प्रती कर्मचारी व्यवसाय		५.०१
खेळते भांडवल		३०२.७७

नियामक मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पाळावयाची आवश्यक प्रमाणके

तपशील	आदर्श प्रमाण	राखलेले प्रमाण
सी.डी.रेशिओ	६०% ते ७०%	७३.१३%
ग्रॉस एनपीए	०% ते १०%	१.३२%
नेट एनपीए	०% ते ५%	०.८५%
सी.आर.आर.	१% ते ५%	२.०९%
एस.एल.आर.	२५% ते ४०%	३१.८५%
सी.आर.ए.आर.	९% पेक्षा जास्त	१७.३८%
थकबाकीचे प्रमाण	०% ते १०%	१.३४%
विनातारणी वैयक्तिक कर्ज प्रमाण	०% ते १५%	२.५२%

संस्थेची तुलनात्मक आर्थिक स्थिती

(रक्कम कोटीत)

अ. नं.	तपशील	२०२३	२०२४	२०२५	२०२६
१	सभासद (अ वर्ग)	१३०३४	१५७०९	१९५३१	२४३८३
२	प्रशासकीय कार्यालयासह एकूण शाखा	९	९	१४	१६
३	वसूल भागभांडवल	१.९३	२.१४	२.३९	२.८०
४	स्वनिधी	१२.७१	१५.८६	१६.८९	२५.०२
५	एकूण ठेवी	१०७.५९	१४८.८५	१९७.७६	२६५.५३
६	एकूण गुंतवणूक	३७.३८	५५.०४	५७.७४	७७.२६
७	एकूण कर्ज	८०.९४	१११.४०	१६०.०७	२१५.०३
८	सी.डी.रेशीओ	६८.३०%	६७.७३%	७५.३१%	७३.१३%
९	निव्वळ नफा	२.०७	२.८७	३.२७	५.२६
१०	थकबाकी रक्कम	४.८०	३.७७	३.२२	२.८९
११	थकबाकीचे प्रमाण	५.९३%	३.३९%	२.०१%	१.३४%
१२	ढोबळ एन.पी.ए.प्रमाण	७.१६%	३.३०%	२.०२%	१.३२%
१३	निव्वळ एन.पी.ए.प्रमाण	३.५६%	०.६०%	०.१४%	०.८५%
१४	एकूण खेळते भागभांडवल	१२३.०७	१७२.८७	२२५.९९	३०२.७७
१५	लाभांश दर	१२.००%	१२.००%	१२.००%	१५.००%
१६	कर्मचारी संख्या	४१	४१	८४	९६
१७	प्रति कर्मचारी व्यवसाय	४.६०	६.३५	४.२६	५.०१
१८	व्यवस्थापन खर्चाचे (खेळते भागभांडवलाशी) प्रमाण	१.६८%	१.३६%	१.३९%	१.३८%
१९	सी.आर.आर.	१.६८%	२.०२%	१.९२%	२.०९%
२०	एस.एल.आर.	३६.४८%	३५.१५%	२७.९०%	३१.८५%
२१	सी.आर.ए.आर.	२०.३७%	१७.९४%	१४.४४%	१७.३८%
२२	लेखापरिक्षण वर्ग	अ	अ	अ	अ

सन्मानीय सभासद बंधू आणि भगिनींनो,
सस्नेह नमस्कार,

दिनांक ३१/०३/२०२६ रोजी संपलेल्या अहवाल वर्षांचा लेखापरिक्षण ताळेबंद व वार्षिक अहवाल या सभेपुढे ठेवण्यास संचालक मंडळास विशेष आनंद होत आहे.

१) सभासद व भागभांडवल

अहवाल वर्षात सुरवातीस संस्थेचे सभासद १९५३१ व भागभांडवल रु.२.३९ कोटी होते.त्यामध्ये अहवाल सालात सभासद ४८५२ व भागभांडवलात रु.४१ लाखाने वाढ झालेली आहे.त्यात ५१ सभासदांनी राजीनामा दिल्यामुळे परत गेलेले भागभांडवल रु.३.७४ लाख असुन दि.३१/०३/२०२६ अखेर सभासद संख्या २४३८३ व भागभांडवल रु.२.८० कोटी झालेले आहे.गत वर्षाच्या तुलनेत वसुल भागभांडवलामध्ये १७.१५% वाढ झालेली आहे.

२) राखीव व इतर निधी

संस्थेचा आर्थिक पाया मजबूत करण्यासाठी संस्थेने विविध प्रकारचे निधी उभारले आहेत.संस्थेकडे गतवर्षी राखीव व इतर निधी रु.१५.७९ कोटी होते.त्यात या वर्षी रुपये ३.४५ कोटीने वाढ होऊन ३१/०३/२०२६ अखेर एकूण राखीव व इतर निधी रु.१९.२४ कोटी इतका झालेला आहेत.त्याचे शेकडा प्रमाण २१.८५% आहे.

३) ठेवी

प्रथम पासूनच संस्थेचे सभासद ठेवीदार व हितचिंतक यांचा संस्थेवर असलेला विश्वास व संस्थेवर असलेल्या आपुलकी पोटी आपली बचत ठेवीच्या स्वरूपात संस्थेत ठेऊन फार मोलाचे सहकार्य केलेले आहे.गतवर्षी अखेर रु.१९७.७६ कोटी इतक्या ठेवी होत्या.त्यामध्ये ६७.७७ कोटीने वाढ होऊन ३१/०३/२०२६ अखेर एकूण ठेवी रु.२६५.५३ कोटी इतकी झालेली आहेत.मागील वर्षीच्या तुलनेत ठेवीमध्ये ३४.२७% इतकी वाढ झालेली आहे.

४) गुंतवणूक

गतवर्षा अखेर संस्थेची एकूण गुंतवणूक रु.५७.७४ कोटी इतकी होती.अहवाल वर्षात रु.१९.५२ कोटी इतक्या रकमेने वाढ झालेली असून,अहवाल वर्षाअखेर एकूण गुंतवणूक ७७.२६ कोटी इतकी झालेली आहे.गतवर्षीच्या तुलनेत गुंतवणुकीमध्ये ३३.८१% ने वाढ झालेली आहे.

५) कर्ज व्यवहार

मागील अहवालात संस्थेची येणे कर्ज रु.१६०.०६ कोटी इतके होते.अहवाल साल अखेर संस्थेची एकूण येणे कर्ज रु.२१५.०३ कोटी इतके आहे. येणे कर्जापैकी १८४.८५ कोटी कर्ज हे सोनेतारण व मुदत ठेवीवर आहे. हे कर्ज वाटपाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. अहवाल सालात येणे कर्जात रु.५४.९७ कोटी इतक्या रकमेची वाढ झालेली आहे.गत वर्षाच्या तुलनेत कर्ज वाढीचे शेकडा प्रमाण ३४.३४% इतके आहे.

(६) शाखा विस्तार

सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात प्रशासकीय कार्यालयासह १४ शाखा कार्यरत होत्या.या आर्थिक वर्षात संस्थेच्या नव्याने विंचूर ता.निफाड व ठाणगाव ता.सिन्नर,या २ शाखा सुरू झाल्या आहे.

संस्थेचे कामकाज ३१/०३/२०२६ अखेर एकूण १+१५ शाखेवर चालू आहे.

७) अनुत्पादक जिंदगी

दि.३१/०३/२०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात संचालक मंडळ व संस्थेचा सेवक वर्ग यांच्या अथक व सर्वांगीण प्रयत्नांमुळे संस्थेने एन.पी.ए.खात्यात मोठ्या प्रमाणात वसुली आणलेली आहे.यासाठी संस्थेच्या कर्जदार सभासदांचे मोलाचे सहकार्य लाभलेले आहे.तसेच नवीन एन.पी.ए.खाती वाढणार नाही. याकडे देखील अतिशय जागृकतेने व विशेषत्वाने लक्ष दिले जात आहे.अशा खात्यांच्या बाबतीत वेळीच वसुलीची कार्यवाही करून पुढील संभाव्य थकबाकी टाळण्यासाठी प्रयत्न केला जात आहे.मा.वैधानिक लेखापरिक्षक साहेब यांनी दिनांक ३१/०३/२०२६ अखेर संस्थेची ढोबळ अनुत्पादीत कर्ज रुपये २.८४ कोटी असून संस्थेच्या येणे कर्जाशी प्रमाण अवघे १.३२% आहे.संस्थेने अनुत्पादक जिंदगी पोटी रक्कम रुपये १.०२ कोटीची तरतूद केलेली आहे.

८) थकबाकी

संस्थेस योग्य सुरक्षित नियमित परतफेड करणारा कर्जदार निवडतांना थकबाकीचे प्रमाण वाढणार नाही याची दक्षता घ्यावी लागते.सहकार विभागाने कर्जवसुलीचे बाबतीत अत्यंत कडक धोरण अवलंबविलेले असून,एखाद्या कर्ज खात्यावरील व्याज १८० दिवसांचे आत वसूल न झाल्यास सदरचे कर्ज खाते अनुत्पादक समजले जात असून,अशा खात्यावर संस्थेस अनुत्पादक जिंदगी पोटी नफ्यातून तरतूद करावी लागते.मार्च अखेरीस थकबाकीचे प्रमाण वाढले तर त्याचा अनिष्ट परिणाम संस्थेच्या प्रगतीवर होतो.त्याची जाणिव कर्जदार सभासद बंधूंनी ठेवणे गरजेचे आहे. त्याकरिता सर्व कर्जदारांनी कर्ज वसुलीसाठी सहकार्य करून त्यांचे विरुद्ध वसुलीसाठी कोर्टात दावे दाखल करावे लागणार नाही याची दक्षता घ्यावी.३१ मार्च २०२६ अखेर एकूण थकबाकी रक्कम रु.२.८९ कोटी इतकी आहे.या अहवाल वर्षात थकबाकीचे प्रमाण १.३४% इतके आहे.

०९) व्यवस्थापन

सुयोग्य व्यवस्थापन करणे ही संस्थेच्या सक्षम कामकाजाच्या दृष्टीने महत्त्वाची बाब आहे.मला नमूद करताना विशेष आनंद होत आहे.की संस्थेचे संचालक मंडळ कर्मचारी वर्ग यांच्या सहयोगाने संस्था व्यवस्थापन खर्चात काटकसर करत आहे.संस्थेच्या व्यवस्थापन खर्चाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण १.३८% इतके आहे. तसेच प्रती कर्मचारी व्यवसाय रु.५.०१ कोटी इतका आहे.संस्थेच्या दैनंदिन कामकाजात आधुनिक संगणक सुविधा, एसएमएस.,सी.सी.टी.व्ही.,सायरन,मोबाईल अलर्ट तसेच झेरॉक्स इ.उपलब्ध सुविधा वापरल्या जातात.

१०) तंत्रज्ञान प्रगती

माहिती व तंत्रज्ञानाचा अवलंब करून ग्राहकाभिमुख जलद व सुलभ सेवा ग्राहकांपर्यंत पोहचविण्यात आपली संस्था नेहमी तत्पर असल्याने संस्था वेगाने प्रगती करत आहे. आपल्या संस्थेने कोअर बँक प्रणाली सन २०१७ मध्ये सुरू केली आहे.संस्थेने **RTGS, NEFT, IMPS, QR-Code, Mobile Collection App, वीजबील भरणा केंद्र** या आधुनिक सेवा संस्थेने सुरू केल्या आहेत.त्याचप्रमाणे ई-मेल,एसएमएस बँकिंग सुविधा सुरू केली आहे.

११) हिशेब तपासणी

दि.०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ या कालावधीचे अंतर्गत लेखापरीक्षण मे. उल्हास बोरसे & असो.,नाशिक यांनी संस्थेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. त्यांनी व त्यांचे सहकारी अधिकारी वर्ग यांनी केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल संस्था त्यांची आभारी आहे. दि.०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ या कालावधीचे वैधानिक लेखापरीक्षण मे.जयेश देसले आणि कंपनी, सनदी लेखापाल, नाशिक यांनी पूर्ण केले आहे. त्यांनी व त्यांचे सहकारी अधिकारी वर्ग यांनी केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

१२) संचालक मंडळ सभा

अहवाल वर्षात संचालक मंडळ,लेखा परीक्षण उपसमिती,कर्ज वसुली समितीच्या प्रत्येकी १२ सभा झालेल्या आहेत. संस्थेचे सर्व संचालक सभेमध्ये कोणत्याही विषयावर एकमताने निर्णय घेतात असे मला अभिमानपूर्वक नमूद करावेसे वाटते.तसेच सर्व संचालक संस्थेच्या कामकाजात भाग घेऊन संस्थेच्या प्रगतीसाठी आपआपल्या परीने प्रयत्नशील असतात.

१३) सामाजिक उपक्रम

आपल्या संस्थेची स्थापना व आजवरची वाटचाल एका उदात्त प्रेरणेने आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून झालेली आहे.सर्वसामान्य जनतेची संस्था म्हणून **एसएसके धनलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. नायगांव** या संस्थेची ओळख व प्रतिष्ठा जनमानसात असून, संस्थेचे संचालक मंडळ त्याच जबाबदारीचे भान ठेवून विश्वस्ताच्या भावनेने काम करीत आहे. या आर्थिक वर्षात संस्थेने जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नायगांव, ता. सिन्नर, जि.नाशिक या विद्यालयातील विद्यार्थ्यासाठी आधुनिक शैक्षणिक अभ्यासासाठी **INTRACTIVE PANEL DISPLAY SCREEN** देण्यात आली. एका दृष्टीने आपल्या संस्थेने व्यावसायिक संस्था व सामाजिक संस्था अशी दुहेरी भूमिका जबाबदारीने एकाचवेळी पार पाडलेली आहे व यापुढेही पार पडेल अशी मी आपणास ग्वाही देतो.

१४) कर्मचारी वर्ग

संस्थेच्या प्रगतीत कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रशिक्षित व कार्यक्षम कर्मचारी हा प्रगत बँकींग व्यवसायाचा कणा आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये.संस्था कर्मचारी वर्गाची बौद्धिक क्षमता व कार्यक्षमता सतत उच्च दर्जाची राहावी ह्या करिता संस्थेने कर्मचाऱ्यांना विविध प्रशिक्षण सत्रात भाग घेण्यासाठी पाठविले. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय अधिकारी,सचिव,शाखाधिकारी व इतर कर्मचारी वर्ग उत्तम व प्रामाणिकपणे ग्राहकांना सेवा देऊन आपली जबाबदारी पार पाडीत आहे. तसेच ग्राहकांना तत्पर सेवा उपलब्ध करून देऊन संस्थेची प्रतिष्ठा उज्ज्वल राखण्याची खडतर जबाबदारी कर्मचारी वर्ग पार पाडीत आहेत.

१५) नफा

आर्थिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये संस्थेस ढोबळ नफा रु.१४.२८ कोटी इतका झालेला असून,घसारा रु.०.४७ लाख,ठेवीवरील व्याज रु.८.०० कोटी,अनुत्पादक गुंतवणूक रु.०.१३ लाख,उत्तम जिंदगी रु.०.१० लाख,अंशदान रु.०.२० लाख, निवडणूक निधी रु.०.१२ लाख इतकी आवश्यक तरतूद वजा जाता अहवाल सालात रु.५.२६ कोटी इतका विक्रमी नफा संस्थेने मिळविलेला आहे.

संचालक मंडळाने शिफारस केलेली नफा वाटणी खालीलप्रमाणे:-

नफा वाटणी तपशील

नफा तपशील	रुपये	नफा वाटणी तपशील	रुपये
दि.३१/०३/२०२६ चा नफा	५,२५,६२,१५०.०१	राखीव निधी (२५.००%)	१,३१,४०,५३७.५०
		इमारत निधी (४६.४३%)	२,४४,०३,६८०.५१
		लाभांश दि.३१/०३/२०२५ चे वसूल भागभांडवल रु.२,३९,१०,७२०/- यावर १५% प्रमाणे (६.८२%)	३५,८६,६०८.००
		संशयित बुडीत निधी (९.१४%)	४८,०५,२२९.००
		उत्तम जिंदगी निधी (७.६१%)	४०,००,०००.००
		गुंतवणूक घसारा निधी (१.००%)	५,२३,६०९.००
		धर्मदाय निधी (२.००%)	१०,५१,२४३.००
		ग्रॅच्युइटी निधी (२.००%)	१०,५१,२४३.००
एकूण	**५,२५,६२,१५०.०१**	**एकूण**	**५,२५,६२,१५०.०१**

१६) आभार

अहवाल वर्षात संस्थेला अनेक व्यक्ती व संस्था यांचे सहकार्य लाभले आहे. विशेष करून सहकार खात्याचे अधिकारी, मा.सहकार आयुक्त व निबंधक साहेब, महाराष्ट्र राज्य पुणे, मा. विभागीय सहनिबंधक साहेब, नाशिक विभाग, मा.जिल्हा उपनिबंधक साहेब, सहकारी संस्था, नाशिक, मा.जिल्हा विशेष लेखापरिक्षक साहेब, नाशिक, सहाय्यक निबंधक साहेब, सहकारी संस्था, सिन्नर यांनी योग्य मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यांचे हार्दिक आभार मानतो. तसेच नाशिक जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचे व सिन्नर तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनचे संचालक तसेच सर्व वकील वर्ग, व्हॅल्युअर्स यांनी संस्थेस वेळोवेळी मार्गदर्शन करून सहकार्य केले. त्याबद्दल त्यांचेही आम्ही आभारी आहोत. आपल्या संस्थेचे सर्व सन्माननीय सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांनी संस्थेबद्दल अतिशय आपुलकी विश्वास दाखवून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य केले. त्याबद्दल सर्वांचे आभार.संस्थेच्या प्रगतीत ज्ञात-अज्ञात व्यक्तिंनी हातभार लावला.त्या सर्वांचे पुनश्च आभार मानून मी हे अहवाल वृत्त संपवतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र! जय सहकार !!

आपला नम्र
संग्राम शिवाजीराव कातकाडे
अध्यक्ष

ताळेबंद पत्रक

दि.३१/०३/२०२६ अखेर

३१/०३/२०२५ अखेर रक्कम	भागभांडवल व देणी	३१/०३/२०२६ अखेर रक्कम
५,००,००,०००	**अधिकृत भागभांडवल**	**५,००,००,०००**
२,३९,१०,७२०	**वसुल भाग भांडवल**	**२,८०,२३,२७०**
२,३९,१०,७२०	शेअर्स खाते	२,८०,२३,२७०
१५,७८,९३,०५५	**राखीव निधी व इतर निधी**	**१९,२४,४९,८५५**
५,२६,८७,५७३	राखीव निधी	६,१२,२८,५४३
६,०८,५०,१५४	इमारत निधी	१०,२४,००,४५७
३,०२,१८,३३७	संशयित बुडीत निधी	१,०२,१८,३३७
५०,००,०००	उत्तम जिंदगी निधी	६०,००,०००
६,९५,९२४	धर्मदाय निधी	९,२४,३०५
०	निवडणुक निधी	१२,००,०००
५२,६४,६७६	ग्रॅच्युइटी निधी	५८,२३,०९६
०	सहकार सक्षमीकरण निधी	१,७८,७२६
३१,७६,३९१	गुंतवणुक घसारा निधी	४४,७६,३९१
१९७,७५,५१,०९०	**ठेवी**	**२६५,५२,८०,५३९**
१२,९१,००,५०९	सेव्हिंग ठेव	१६,५९,०३,४८८
६,९८,७५८	अल्पबचत प्रतिनिधी सुरक्षा ठेव	१०,५५,५७५
१७,८५,८४,२००	नवरात्रौत्सव ठेव	२९,९२,७०,१८७
८,२६,११,९११	महिला सन्मान मुदत ठेव	४,२७,८१,१७९
५९,३५,०००	महिला सन्मान मासिक ठेव	५०,००,०००
१४,३३,०००	जिवन सुरक्षा योजना	१६,६३,५००
०	धनसंचय ठेव	१८,५२,९७,१३०
३,८७,७४,८१०	मासिक ठेव	७,८१,८९,४८०
१२४,११,७९,५८४	मुदत ठेव	१७५,९२,५३,५२२
२४,२९,०२३	बालकल्याण ठेव	१७,२६,२६८
१,४२,४०,३८८	दामदुप्पट ठेव	१,४६,६८,१२९
२१,७९,५०,६९५	धनवृद्धी ठेव	०
१६,६९,३७९	रिकरींग ठेव	२२,९३,२७९
७,११,४९१	समृद्धी एसआयपी ठेव	५७,९५,०६८
६,२०,९७,९५०	अल्पबचत ठेव	९,२१,८९,८४७
६१,०००	लॉकर ठेव	१,५८,०००
७३,३९२	अल्पबचत प्रतिनिधी अनामत	३५,८८७
२,११,३४,७३१	**बँक ॲडव्हांसेस**	**८४,५६,४३९**

ताळेबंद पत्रक

दि.३१/०३/२०२६ अखेर

३१/०३/२०२५ अखेर रक्कम	जिंदगी व येणी	३१/०३/२०२६ अखेर रक्कम
३,३४,४३,७१७	**रोख व बँक शिल्लक**	**५,०६,०४,६७४**
३,३४,४३,७१७	रोख व बँक शिल्लक	५,०६,०४,६७४
५७,७३,७५,७३५	**बँक गुंतवणूक**	**७७,२५,५६,९५१**
१,९३,७७,८५९	सरस्वती सहकारी बँक मुदत ठेव	३,१३,७५,७०२
४,७१,२२,८६३	लोकनेते आरडी अप्पा बँक मुदत ठेव	२,८९,४०,४०६
१,३६,२४,८९५	बिझनेस को-ऑप.बँक (इमारत निधी ठेव)	१,४७,३९,३४४
२,५७,७७,०२२	लातूर बँक मुदत ठेव	२,७४,१३,२८२
६,६०,७२,४११	जनकल्याण बँक मुदत ठेव	५,२२,१७,०२४
१,१६,८४,६८७	शामराव विठ्ठल को.ऑप बँक मुदत ठेव	०
७४,३०,१४५	ना.रोड.दे.व्या.बँक मुदत ठेव	४७,०५,०९२
०	लोकनेते दत्ताजी पाटील सह.बँक लि.मुदत ठेव	५,१०,८२,४६०
४,४६,२३,५१३	दि बारामती सहकारी बँक मुदत ठेव	४,७९,८४,४४४
५,१७,१०,४४३	राजलक्ष्मी अर्बन को.ऑप बँक मुदत ठेव	५,९४,३४,९६९
३८,८३,१३९	अंदरसुल अर्बन को.ऑप बँक मुदत ठेव	१,४५,४०,१२०
४,९१,४४,७४१	दि नासिक मर्चन्ट को.बँक मुदत ठेव	६,८६,४६,९४६
४,६१,४७,५६६	दि बिझनेस को.ऑप बँक मुदत ठेव	५,०१,४८,८९७
४,६६,७१,९१७	विश्वास को ऑप बँक मुदत ठेव	६,०३,३१,६८८
५७,७४,०४१	दि.कॉसमॉस को.ऑप बँक मुदत ठेव	०
१०,०४,७४०	सारस्वत बँक मुदत ठेव	२,१०,९९,२६०
२५,०५०	ना.जि.म. बँक शेअर्स	२५,०५०
८,०००	पतसंस्था फेडरेशन शेअर्स	८,०००
५,८८,७६,६३७	ना.जि.म.बँक सेव्हिंग्ज (राखीव निधी ठेव)	६,०१,९५,५०६
९,११,६५८	ना.जि.म.बँक सेव्हिंग्ज (इमारत निधी ठेव)	९,२९,९५४
४,५०,००,०००	गोदा युनि.कृ.सेवा संस्था मुदत ठेव	४,४४,००,०००
३५,००,०००	यस बँक मुदत ठेव	०
५२,६२,६८५	कर्मचारी एलआयसी ग्रॅच्युइटी ठेव	५८,२३,०९५
३०,८२,०४३	गव्हर्मेंट सिक्युरीटी बॉंड	१५,८२,०४३
१,६४,१०,०००	सिस्टीमॅटीक इनव्हेस्टमेंट प्लॅन	०
४२,४९,६८०	युनिटी स्मॉल फाय.बँक ठेव (पीएमसी)	४२,४९,६८०
०	दि महाराष्ट्र को-ऑप बँक बॉंड	५,२३,८२,५०४
०	दि निफाड अर्बन को ऑप बँक	१,०२,५९,८४१
०	सारस्वत को-ऑप बँक बॉंड	२,००,००,०००
०	ठाणे जनता सहकारी बँक लि	४,००,४१,६४४

ताळेबंद पत्रक

दि.३१/०३/२०२६ अखेर

३१/०३/२०२५ अखेर रक्कम	भागभांडवल व देणी	३१/०३/२०२६ अखेर रक्कम
४,६८१	लोकनेते आरडी अप्पा बँक	०
५२,४६२	सरस्वती सहकारी बँक	७६,२०,२८५
१,२३,७७७	जनकल्याण बँक	५९,६७१
१,४५,१३,९०४	विश्वास को ऑप बँक	४३,८६१
५२,३१,९०३	दि बिझनेस को.ऑप बँक	५५,५६३
१६५	शामराव विठ्ठल को.ऑप बँक	०
६,३०७	अंदरसुल अर्बन को.ऑप बँक	८,११३
०	लो दत्ताजी पाटील सह बँक	३०,६६७
११,४४,९५६	दि बारामती सहकारी बँक	५,०२,५८१
५६,५७६	दि नासिक मर्चन्ट को.बँक	१,३५,६९८
७८,९०,७१६	**इतर देणी**	**१,०९,२३,८७४**
५,८९५	कर्मचारी विमा	०
०	सस्पेन्स खाते	२,५३,९२१
५,७१,०००	ऑडीट फी तरतूद	५,८०,७९९
१,२२,०४४	लाभांश	१,३६,४३५
१५,००,०००	अंशदान	३५,००,०००
५६,९१,७७७	थकीत व्याज तरतुद (NPA)	६४,५२,७१९
३,७९,१३,१३५	**तरतुद**	**७,९९,७३,३२३**
३,७९,१३,१३५	ठेवीवरील व्याज	७,९९,७३,३२३
३,३६,४७,८८१	**नफा-तोटा खाते**	**५,२५,६२,१५०**
३,२७,३८,०५४	निव्वळ नफा	५,२५,६२,१५०
९,०९,८२७	संचित नफा	०
०		०
०		०
०		०
२२५,९९,४१,३२८		**३०२,७६,६९,४५०**

जयेश देसले & कंपनी
चार्टर्ड अकौंटंट
(वैधानिक लेखापारीक्षक)

उल्हास बोरसे & कंपनी
चार्टर्ड अकौंटंट
(अंतर्गत लेखापारीक्षक)

संचालक मंडळ

सुनिल भाबड
मुख्य कार्यकारी अधिकारी

प्रकाश जेजुरकर
व्हा.चेअरमन

संग्राम कातकाडे
चेअरमन

ताळेबंद पत्रक

दि.३१/०३/२०२६ अखेर

३१/०३/२०२५ अखेर रक्कम	जिंदगी व येणी	३१/०३/२०२६ अखेर रक्कम
१६०,०६,४८,५०१	**कर्ज व ॲडव्हान्सेस**	**२१५,०३,३१,८७८**
८,६०,५०,०७४	ठेव ॲडव्हान्स	१५,३१,०४,६४१
५,०६,३४,८४५	व्यावसायिक कर्ज	५,८२,७५,२०७
१२५,८४,५५,७७७	सोनेतारण कर्ज	१६९,५४,४१,९६४
४४,८३,६१८	महिला समृध्दी कर्ज	४८,२७,६४८
२,१४,९३,६४४	व्यावसायिक विनातारण कर्ज	२,६४,३६,८४७
८९,७५,४१७	वैयक्तिक कर्ज	२,२२,२९,४७३
६,१२,३५०	हायरपर्चेस कर्ज	३,५२,१७६
१०,३९,४३,३८३	स्थावर तारण कर्ज	९,९७,०२,८४६
५,६१,०८,८८६	कॅशक्रेडीट कर्ज	७,४५,५२,०५४
१०,८१,९८४	दुग्ध व्यवसाय कर्ज	७,९६,४४३
८८,०८,५२३	सेवक कर्ज	१,४६,१२,५७९
२,६७,४५,३०७	**डेडस्टॉक व फर्निचर**	**३,२८,९०,०८३**
२,६७,४५,३०७	डेडस्टॉक व फर्निचर	३,२८,९०,०८३
६५,२४,३२१	**इमारत व मालमत्ता**	**६१,२८,७१९**
६५,२४,३२१	इमारत व मालमत्ता	६१,२८,७१९
१,५२,०३,७४७	**इतर येणी**	**१,५१,५७,१४५**
२०,७६,२७३	ॲडव्हान्स (उचल)	७,९०,०८७
९,६००	स्टॅम्प	१२,६००
२८,१५,१०५	गुंतवणुकीवरील व्याज	२७,५१,१३०
५६,९१,७७७	थकीत व्याज (NPA)	६४,५२,७१९
३८,३७,०४२	टी डी.एस अनामत	४२,०९,७२६
७,५४,६२०	अनामत	९,०४,६२०
१९,३३०	युपिआय	३६,२६२
२२५,९९,४१,३२८		**३०२,७६,६९,४५०**

जयेश देसले & कंपनी
चार्टर्ड अकौंटंट
(वैधानिक लेखापारीक्षक)

उल्हास बोरसे & कंपनी
चार्टर्ड अकौंटंट
(अंतर्गत लेखापारीक्षक)

संचालक मंडळ

सुनिल भाबड
मुख्य कार्यकारी अधिकारी

प्रकाश जेजुरकर
व्हा.चेअरमन

संग्राम कातकाडे
चेअरमन

नफा- तोटा पत्रक

दि.०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ करिता

सन २०२४-२५ रक्कम	खर्च तपशील	सन २०२५-२६ रक्कम
१३,४७,०२,१३६	ठेव व अधिकर्ष व्याज	२०,५९,०७,६४३
४२,३४,८९५	कमिशन व दलाली	५९,१४,३२८
१,६०,८८,९८९	पगार व भत्ते	२,२२,६०,२४९
२०,७७,८४१	भाडे,कर,विमा	२७,६३,९९१
११,३५,८१४	स्टेशनरी व जाहिरात	१६,२९,९४३
३४,६३,८९२	घसारा व दुरुस्ती	४६,९०,९३९
४२,६३,५८८	इतर खर्च	४५,००,६५०
३९,६७,५८५	इतर जोखीम तरतूद	५५,३२,३२७
३,२७,३८,०५४	नफा	५,२५,६२,१५०
२०,२६,७२,७९३	**एकूण**	**३०,५७,६२,२२०**

सन २०२४-२५ रक्कम	उत्पन्न तपशील	सन २०२५-२६ रक्कम
१९,९१,९९,३१४	कर्ज व गुंतवणुक व्याज	२९,८४,८२,४२४
२,६१,८२३	कमिशन व दलाली	४,३९,६६४
८,६७,७०६	भाडे,कर,विमा	१६,१३,३३७
२३,४३,९५०	इतर उत्पन्न	५२,२६,७९५
२०,२६,७२,७९३	**एकूण**	**३०,५७,६२,२२०**

जयेश देसले & कंपनी
चार्टर्ड अकौंटंट
(वैधानिक लेखापारीक्षक)

उल्हास बोरसे & कंपनी
चार्टर्ड अकौंटंट
(अंतर्गत लेखापारीक्षक)

संचालक मंडळ

सुनिल भाबड
मुख्य कार्यकारी अधिकारी

प्रकाश जेजुरकर
व्हा.चेअरमन

संग्राम कातकाडे
चेअरमन

सन २०२५-२६ चे सिंहावलोकन व सन २०२६-२७ सालाचे अंदाजपत्रक

(रक्कम लाखात)

अ. क्र.	खर्च तपशील	सन २०२५-२६ साठी अंदाज	प्रत्यक्ष खर्च	सन २०२६-२७ साठी अंदाज
अ	ठेव व अधिकर्ष व्याज	१८,००,००,०००	२०,५९,०७,६४३	२८,००,००,०००
ब	कमिशन व दलाली	५०,००,०००	५९,१४,३२८	८०,००,०००
क	पगार व भत्ते	२,५०,००,०००	२,२२,६०,२४९	३,४०,००,०००
ड	भाडे,कर,विमा	२५,००,०००	२७,६३,९९१	४०,००,०००
इ	स्टेशनरी व जाहिरात	१५,००,०००	१६,२९,९४३	२५,००,०००
ई	घसारा व दुरुस्ती	५०,००,०००	४६,९०,९३९	७०,००,०००
ग	इतर खर्च	५०,००,०००	४५,००,६५०	६०,००,०००
घ	इतर जोखीम तरतूद	५०,००,०००	५५,३२,३२७	७०,००,०००
	एकूण खर्च	२२,९०,००,०००	२५,३२,००,०७०	३४,८५,००,०००
	नफा	३,०४,००,०००	५,२५,६२,१५०	६,१६,००,०००
	एकूण	**२५,९४,००,०००**	**३०,५७,६२,२२०**	**४१,०१,००,०००**

अ. क्र.	उत्पन्न तपशील	सन २०२५-२६ साठी अंदाज	प्रत्यक्ष उत्पन्न	सन २०२६-२७ साठी अंदाज
अ	कर्ज व गुंतवणुक व्याज	२५,५०,००,०००	२९,८४,८२,४२४	४०,००,००,०००
ब	कमिशन व दलाली	३,५०,०००	४,३९,६६४	६,००,०००
क	भाडे,कर,विमा	१३,५०,०००	१६,१३,३३७	२५,००,०००
ड	इतर उत्पन्न	२७,००,०००	५२,२६,७९५	७०,००,०००
	एकूण	**२५,९४,००,०००**	**३०,५७,६२,२२०**	**४१,०१,००,०००**

संचालक मंडळ

सुनिल भावड
मुख्य कार्यकारी अधिकारी

प्रकाश जेजुरकर
व्हा.चेअरमन

संग्राम कातकाडे
चेअरमन

वैधानिक लेखापरिक्षकाचा अहवाल

आम्ही, **एसएसके धनलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, नायगांव,** ता. सिन्नर (जि. नाशिक) चा सोबत जोडलेला दिनांक ३१ मार्च २०२६ अखेरीचा ताळेबंद आणि त्याच दिवशी संपणाऱ्या वर्ष अखेरीचे सोबत जोडलेले नफा तोटा पत्रक यांचे लेखापरीक्षण केले. सदरची आर्थिक पत्रके तयार करण्याची जबाबदारी पतसंस्थेच्या व्यवस्थापनाची असून या आर्थिक पत्रकांच्या लेखापरीक्षणावर आधारित आमचे मत व्यक्त करण्याची जबाबदारी आमची आहे.

सामान्यतः भारतात मान्य असलेल्या लेखापरीक्षणाच्या दर्जास अनुसरुन आम्ही पतसंस्थेचे लेखापरीक्षण केले आहे, या दर्जानुसार असे अपेक्षित आहे की, आम्ही लेखापरीक्षणाचे नियोजन करुन ते प्रत्यक्षात करताना मिळालेली आर्थिक पत्रके ही परिणामकारक अशा चुकीच्या माहितीपासून मुक्त असल्याची तर्कसंगतदृष्टया खात्री करावी. लेखा परीक्षणामध्ये आर्थिक पत्रकात दिलेली माहिती आणि रकमा यांच्या पुष्ठयर्थ दिलेल्या पुराव्यांची अंशतः तपासणी करण्याचा समावेश होतो. लेखापरीक्षणामध्ये व्यवस्थापनाने अनुसरलेली हिशोबाची तत्वे आणि महत्वाचे अंदाज याचा आढावा घेणे तसेच दाखल केलेल्या सर्वसाधारण अर्थिक पत्रकांचे मुल्यमापन करणे याचाही समावेश आहे. आम्हाला विश्वास आहे की, आमच्या लेखा परीक्षणाचा आमच्या मतांना पुरेसा आधार आहे.

अहवालातील परिशिष्ठानुसार आमच्या शेऱ्यास पात्र राहून खालीलप्रमाणे दाखला देण्यात येतो की, आम्ही आमच्या माहिती व ज्ञानास अनुसरुन लेखापरीक्षणासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती उपलब्ध करुन घेतलेली आहे. आमच्या मते कायद्यानुसार आवश्यक असलेली योग्य ती हिशोबाची पुस्तके पतसंस्थेने ठेवलेली आहेत असे आमच्या तपासणीत दिसून आले आहे. या तपासणीशी संबंधित असलेली तेरीज, ताळेबंद आणि नफा तोटा पत्रके ही कायद्यातील तरतुदींनुसार निर्धारीत केलेल्या हिशोबाच्या पुस्तकांशी सुसंगत आहे.

आमच्या मताप्रमाणे व आमच्या माहितीप्रमाणे आणि आम्हास देण्यात आलेल्या स्पष्टीकरणाप्रमाणे महाराष्ट्र को- ऑपरेटिव्ह सोसायटीज अॅक्ट १९६० आणि त्याखालील नियमा नुसार आवश्यक असलेली सर्व हिशोबाची माहिती जशी आवश्यक आहे तशी प्राप्त झालेली असून ती भारतामध्ये साधारणतः मान्य असलेल्या हिशोबाच्या तत्वांशी जुळती आहेत आणि सोबत जोडलेल्या लेखापरिक्षण अहवालातील नमुना १, व भाग अ, ब, क मधील आमच्या शेऱ्यास अनुसरुन खालील हिशोबपत्रके सत्य व योग्य असल्याचे दर्शवितात.

१. दिनांक. ३१.०३.२०२६ अखेरच्या तेरीज ताळेबंदात दर्शविलेल्या आर्थिक स्थिती संदर्भात आणि

२. दिनांक.३१.०३.२०२६रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षाच्या नफातोटा पत्रकात दाखविलेल्या नफ्यासंदर्भात.
२०२५-२६ सहकारी वर्षासाठी संस्थेचे लेखा परीक्षण वर्ग **"अ"** देण्यात आला आहे.

जयेश देसले आणि कंपनी करीता
चार्टर्ड अकौंटंट्स
फर्म रजि.नं. १२६७७३W
सी.ए. जयेश एस. देसले
भागिदार
में.नं.१२०८७७
दिनांक-३०.०८.२०२६
ठिकाण : २६१२०८७७VQQQX०६५१३

मौजे ब्राह्मणवाडे, ग्रामपंचायत, ता.सिन्नर येथे विठ्ठल रुख्मिणी मंदिर परिसरात पाण्याची टाकी देतांना संस्थेचे विभागीय अधिकारी विलास केदार, ब्राह्मणवाडे शाखाधिकारी प्रसाद चव्हाण व इतर मान्यवर

प्राथमिक आरोग्य केंद्र, नायगांव, ता. सिन्नर येथे संस्थेतर्फे ध्वज स्तंभ बांधून देण्यात येवून ध्वजारोहण करतांना उपाध्यक्ष श्री. प्रकाश जेजुरकर, नायगांव शाखाधिकारी किरण जेजुरकर व इतर मान्यवर

जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, नायगाव, ता. सिन्नर येथील शालेय विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शैक्षणिक अभ्यासासाठी INTRACTIVE PANERL DISPLAY SCREEN भेट देतांना. संस्थेच्या मार्गदर्शिका कुसुमताई कातकाडे व इतर मान्यवर

महाराष्ट्रातील अतिवृष्टीने बाधित झालेल्या शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी रक्कम रु. १,११,१११/- विभागीय सहनिबंधक संभाजी निकम यांचेकडे सुपुर्द करतांना संस्थेचे चेअरमन, संचालक मंडळ व मुख्य कार्यकारी अधिकारी

प्रशासकीय कार्यालय

सहकार भवन, नायगांव, ता. सिन्नर, जि. नाशिक

९८२२८८०५२१

नायगांव
सहकार भवन, नायगांव,
ता.सिन्नर, जि.नाशिक
८७९९९५८५०२

सिन्नर
श्री लेले संकुल,खडकपुरा,
सिन्नर,ता.सिन्नर, जि.नाशिक
८७९९९५८५०४

सायखेडा
खडकपुरा लेन,सायखेडा,
ता.निफाड, जि.नाशिक
८७९९९५८५०५

निफाड
जनसेवा हॉस्पिटल,
उगावरोड,निफाड,
ता.निफाड,जि.नाशिक
८७९९९५८५०६

नाशिकरोड
देहबर्ज अपार्टमेंट,
बिटको पॉइंट, नाशिकरोड,
ता.नाशिक, जि.नाशिक
८७९९९५८५०३

नांदूरशिंगोटे
महाराष्ट्र बँके शेजारी,
नांदूरशिंगोटे,
ता.सिन्नर, जि.नाशिक
८७९९९५८५०७

दिंडोरी
शिवाजी मार्केट,
पालखेड रोड,दिंडोरी,
ता.दिंडोरी,जि.नाशिक
८७९९९५८५०८

येवला
कै.मा.आ.माधवराव पाटील
संकुल, येवला,
ता.येवला, जि.नाशिक
८७९९९५८५०९

वऱ्हेदारणा
(चितेगाव फाटा)
लालपाडी रोड, वऱ्हेदारणा,
ता.निफाड, जि.नाशिक
८७९९९५८५००

ब्राम्हणवाडे
मु.पो.ब्राम्हणवाडे,
ता.सिन्नर,जि.नाशिक
९२२६५३८४११

दापुर
मु.पो.दापुर,
ता.सिन्नर,जि.नाशिक
९२२६५३८४१२

सरदवाडीरोड (सिन्नर)
सरदवाडीरोड,सिन्नर
ता.सिन्नर,जि.नाशिक
९२२६५३८४१३

उमराळे बु.
मु.पो.उमराळे बु.
ता.दिंडोरी,जि.नाशिक
९२२६५३८४१४

विंचुर
साई श्रद्धा संकुल,दुसरा मजला,
कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय
शेजारी,विंचुर
ता.निफाड,जि.नाशिक
९२२६५३८४१०

ठाणगाव
काकड बिल्डींग,
बस स्टॉप समोर,
ठाणगाव ता.सिन्नर,जि.नाशिक
९२२३७०२२१५

दोडी बु.
मु.पो.दोडी बु.
ता.सिन्नर,जि.नाशिक
९२२३७०२२१६

चास
मु.पो.चास
ता.सिन्नर,जि.नाशिक
८७९९९५८५०१
(नियोजित)

निमोण
मु.पो.निमोण
ता.संगमनेर, जि.नाशिक
(नियोजित)

38 वा
वार्षिक अहवाल
— 2025-2026 —

प्रति,

श्री./सौ./श्रीमती ______________________________

____

____

प्रेषक

संग्राम शिवाजीराव कातकाडे

अध्यक्ष : एसएसके धनलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.नायगांव (सिन्नर)
अध्यक्ष : सिन्नर तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. ता. सिन्नर, जि. नाशिक

स्थापना: १९८८
एसएसके धनलक्ष्मी
नागरी सहकारी पतसंस्था मर्या. नायगांव (सिन्नर)

प्रशासकीय कार्यालय : सहकार भवन, नायगांव, ता. सिन्नर

संपर्क : ९८२२ ८८ ०५२१ | www.sskdhanlaxmi.com | Follow us on :

BRAND MAKER | 8805058899